दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक १९४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.८ ऑक्टोबर २०२० ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ...तर मराठा समाज एमपीएससी केंद्र बंद पाडेल

## मराठा आरक्षणावरून छत्रपती संभाजीराजे आक्रमक

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

आज नवी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या मराठा आरक्षण परिषदेमध्ये मराठा आरक्षणावरून संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक भूमिका मांडली. तसेच मराठा आरक्षणाच्याबाबत राज्य सरकारने मराठा समाजाला फसवले असून, सरकारच्या हाती असलेल्या गोष्टीही राज्य सरकार करत नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच एमपीएससी परीक्षेबाबत राज्य सरकारने मराठा समाजाचं ऐकलं नाही तर मराठा समाज एमपीएससी केंद्र बंद पाडेल, असा इशारा संभाजीराजेंनी दिला.



मराठा आरक्षण परिषदेमध्ये उपस्थितांना संबोधित करताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचं स्वराज्य हे अठरापगड जातींचं होतं. मात्र आज त्यातून मराठा समाज बाहेर का फेकला गेलाय. बहुजनांसाठी शाहू महाराजांनी आरक्षण दिले होते. मात्र आता मराठा समाज आरक्षणापासून वंचित का राहिलाय, असा सवाल करत संभाजीराजेंनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्य सरकारवर टीकेची तोफ डागली.

मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने मराठा समाजाला फसवलं आहे. या विषयाबाबत राज्य सरकारच्या हातात ज्या गोष्टी आहेत त्याही त्यांनी केलेल्या नाहीत. राज्य सरकारने सारथी संस्था बुडवली.

अण्णासाहेब पाटील महामंडळाचा राज्य सरकारने खेळखंडोबा केला. सरकार मराठा समाजासोबत किती काळ खेळणार आहे. एमपीएससीमधून ४२७ विद्यार्थी पास झाले. त्यातील १२७ मराठा समाजातील आहेत. त्यांच्या नियुक्त्या रखडल्या आहेत. त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल त्यांनी केला.

**एमपीएससीची परीक्षा परीक्षा होऊ नयेत अशी मराठा समाजाची भावना आहे. मात्र तरीही सरकार परीक्षा देण्याची घाई का करत आहे, असा सवाल विचारत सरकारने ऐकले नाही तर मराठा समाज एमपीएससीचे केंद्र बंद करेल. त्यामुळे राज्य सरकारने कॅबिनेटमध्ये याबाबत निर्णय घ्यावा.**

**: छत्रपती संभाजीराजे**

# आयपीएलवर सट्टा लावणाऱ्यांचा रायगड पोलिसांकडून पर्दाफाश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आयपीएल क्रिकेट मॅचेसवर ऑनलाईन सट्टा खेळणाऱ्यांचा रायगड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी ११ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कर्जतमध्ये दोन सट्टेबाजांना बेड्या ठोकल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. या सट्टेबाजांचे दुबई कनेक्शन असून त्या दिशेने तपास सुरु असल्याचे पोलीस अधिक्षक अनिल पारसकर यांनी सांगितले.



सध्या देशात आयपीएल मॅचेसचा फिव्हर आहे. ही क्रिकेट स्पर्धा दुबई, शारजा व अबुधाबी या ठिकाणी सुरु आहे. जगभरातील क्रिकेट प्रेमींना जितकी या स्पर्धेची उत्सुकता असते, तितकीच उत्सुकता या स्पर्धे दरम्यान सट्टा खेळणार्या बुकींना असते. १९ सप्टेंबर रोजी 'इंडियन प्रिमीअर लिग-२०२०' (आयपीएल) ला सुरुवात झाली. त्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अनिल पारस्कर व अपर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ यांनी सदर स्पर्धेवरुन बेटींग (सट्टा) लावणार्यांवर विशेष लक्ष केंद्रीत केले होते. अशा काही हालचाली आढळून आल्यास कारवाई करण्याच्या सूचना रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक जे.ए.शेख यांना दिल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या गोपनीय बातमीदारांना सतर्क केले होते.

अशाच प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे १ ऑक्टोबर रोजी रात्री १०.२० वाजता पोलीस निरीक्षक जे.ए.शेख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कर्जत तालुक्यातील खांडपे येथील हॉटेल००७

## कर्जत येथील दोघांसह ११ जण अटकेत ; पाच बुकी फरार

युनिव्हर्स रिसॉर्टच्या रुम नंबर १२० मध्ये छापा टाकला. त्या ठिकाणी कांती करमसीभाई वारसुंगीया (वय ४३, रा. कोपरी, ठाणे), प्रकाश पोपट पुजारी (वय ४२, रा. मुलूंड, मुंबई) या दोघांना आय.पी.एल.मधील किंग्ज ईलेव्हन पंजाब व मुंबई इंडियन्स या दोन संघांमध्ये सुरु असणार्या क्रिकेट सामन्यावर सट्टा खेळतांना रंगेहाथ पकडण्यात आले.

त्यांच्या ताब्यातून सट्टा खेळण्यासाठी वापरत असलेले एकूण ५ मोबाईल फोन्स, कॅल्क्यूलेटर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. अधिक तपासात, कांती वारसुंगीया व प्रकाश पुजारी हे वेगवेगळ्या मोबाईल फोन्सच्या माध्यमातून वेगवेगळ्या मोबाईल ॲप्स व आय.डी. यांच्या मदतीने आय.पी.एल. क्रिकेट सामन्यांवर सट्टा खेळत ..../२

## संक्षिप्त...

### जागतिक बँकेने थोपटली मुंबई महानगरपालिकेची पाठ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या महिन्यापासून मुंबईत कोरोना बाधित रुग्णांचा आकडा पुन्हा वाढत आहे. मात्र आशिया खंडातील मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीमध्ये रुग्ण संख्या अद्याप नियंत्रणात आहे. धारावी पॅटर्नच्या या यशाची दखल आता थेट जागतिक बँकेने घेतली आहे. प्रतिबंधक उपाय, सर्व खबरदारीबरोबरच समुदायाचा सहभाग आणि चिकाटी हेच धारावी पॅटर्नचे यश असल्याचे कौतुक जागतिक बँकेने केले आहे. कोरोनामुक्तीच्या धारावी पॅटर्नचे कौतुक संपूर्ण जगात केले जात आहे. जागतिक आरोग्य संघटना, वॉशिंग्टन पोस्ट यांनी धारावीप्रमाणे कोरोना विरुध्द लढा देण्याचा सल्ला अन्य देशांना दिला. त्यावर अंमल करीत धारावीत यशस्वी ठरलेली ' चेस द व्हायरस ' ही मोहीम फिलिपिन्स सरकार तेथील झोपडपट्ट्यांमध्ये राबवित आहे. अडीच चौरस किलोमीटर वस्तीमध्ये दाटीवाटीने वसलेली साडेआठ लाख लोकसंख्या, अशा धारावीमध्ये कोरोनाचा प्रसार गेले तीन महिने नियंत्रणात असल्याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मुंबईत ११ मार्च रोजी पहिला रुग्ण आढळून आला, त्यांनतर तीन आठवड्यांनी धारावीत रुग्ण सापडला. शासकीय यंत्रणा, लोकसहभाग आणि खाजगी वैद्यकीय क्लिनिकच्या माध्यमातून धारावीतील सर्व नागरिकांची तपासणी करण्यात आली. वेळीच रोगाचे निदान व तात्काळ उपचारामुळे जुलै २०२० मध्ये धारावीत कोरोना रुग्णांच्या संख्येत मोठी घट झाली, असे निरीक्षण 'द्विवार्षिक गरीबी आणि सामायिक समृद्धी' अहवालात जागतिक बँकेने नोंदविले आहे.

# जिल्हाधिकारी निधी चौधरी यांचे सुरक्षा पट्ट्याच्या मोजणीचे निर्देश

**दै.रायगड नगरी । घनःश्याम कडू**

**उरण** : उरणमध्ये सेफ्टी झोनचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. मात्र जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत नेव्हल अपार्टमेंट डेपो, करंजा उरण यांच्या सुरक्षा पट्टयाच्या मोजणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात आज तहसील कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



गेली अनेक वर्षांपासून उरण सेफ्टी झोनचा प्रश्न न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबत तत्कालीन आमदार मनोहरशेठ भोईर यांनी या प्रश्नावर राज्य सरकारने नगरविकस विभाग महाराष्ट्र शासनातर्फे जा. क्र. 1715/UOR - 66/CR 101/19/UD - 12 दि. १४/०८/२०१९ ने मा. सचिव, केंद्रीय संरक्षण विभाग यांना सदर सेफ्टी झोन बाबत दि. १६/ ५/१९९२ची नोटीफिकेशन व्यपगत झाल्याबाबतचा प्रस्ताव पाठविला आहे हा हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे हा निर्णय केंद्र सरकारच्या हातात असून तो आजतागायत प्रलंबित आहे.

एनएडी करंजा यांच्या सुरक्षा पट्टयाच्या मोजणी संदर्भात जिल्हाधिकारी ..../२

# रिया चक्रवतीची भायखळा जेलमधून झाली सुटका



**दै.रायगड नगरी । मुंबई**

सुशांत सिंग राजपूत प्रकरणात ड्रग्स कनेक्शनमध्ये अटक झालेल्या रिया चक्रवर्तीला आज सकाळी मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. ड्रग्स खरेदी केल्याच्या आरोपाखाली रिया चक्रवर्ती, शौविक चक्रवर्ती आणि इतर १८ आरोपींची आज न्यायालयीन कोठडी संपणार होती. मात्र, याप्रकरणी मंगळवारी सुनावणी करताना मुंबई कोर्टाने रिया आणि शौविक चक्रवर्तीच्या न्यायालयीन कोठडीत २० ऑक्टोबरपर्यंत वाढ केली होती. त्यानंतर, आज हायकोर्टाने रियाला सशर्त जामीन मंजूर केला असून शौविकचा जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यानंतर भायखळ्यातील कारागृहातून ..../२

# रायगड पोलीस अधिक्षकपदी अशोक दुधे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगडचे पोलीस अधीक्षक अनिल पारस्कर यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी रायगडचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून अशोक दुधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाच्या गृह विभागाकडून आज (७ ऑक्टोबर) भारतीय पोलीस सेवेतील पोलीस अधीक्षक व पोलीस उपायुक्त दर्जाच्या अधिकार्यांची बदलीने पदस्थापना करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. या आदेशानुसार रायगडचे पोलीस अधीक्षक अनिल पारस्कर यांची बदली करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी रायगडचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून अशोक दुधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



पोलीस महासंचालक यांच्या आदेशानंतर संबंधीत नियंत्रक अधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती विचारात घेऊन, संबंधित अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कार्यमुक्त करावे व त्यानंतर संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या पदावर रुजू होऊन तसा अहवाल शासनाला सादर केला आहे.

# ...जर सरकारकडून होणार नसेल तर मनसेच्या पद्धतीने कारवाई करावी लागेल : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महिला बचत गटांनी मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेऊन स्वत:चा व्यवसाय करणं आणि त्यांचा विस्तार करणं नित्याची बाब आहे, कधीही या महिलांनी कर्जाचा हफ्ता चुकवण्यात दिरंगाई केली नाही, परंतु लॉकडाऊनमुळे या ग्रामीण भागातील महिलांचे व्यवसाय जवळपास ठप्प झाल्याने त्यांना आर्थिक फटका बसला आहे. यातच मायक्रो फायनान्स कंपनीकडून महाराष्ट्रात दंडेलशाही सुरु केली आहे. या संदर्भात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र लिहिलं आहे.



या पत्रात राज ठाकरेंनी म्हटलंय की, कोणत्या परिस्थितीचा विचार न करता मायक्रो फायनान्स कंपन्या कर्जदाराच्या घरी जाऊन दमदाटी करणे, चारचौघात अपमान करणे असले प्रकार सर्रास करत आहेत. या विषयाच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या दंडेलशाहीवर सरकारने अंकुश ठेवायला हवा, कर्जदाराच्या घरी जाऊन त्याची अब्रू चव्हाट्यावर आणण्याचा अधिकार ह्या कंपन्यांना कोणी दिला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तसेच हा विषय गंभीर आहे आणि हे जर असचं सुरु राहिलं तर लक्षात ठेवा ह्यांचे मानसिक आणि सामाजिक परिणाम गंभीर असतील, म्हणून सरकारने आता जागे व्हावे आणि पोलीस प्रशासनाच्या मार्फत ह्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या अरेरावीला चाप बसवा आणि हे जर सरकार म्हणून तुमच्याकडून होणार नसेल तर माझ्या महाराष्ट्र सैनिकांना त्यांच्या पद्धतीने कारवाई करावी लागेल ..../२

# राज्यांतर्गत ५ एक्सप्रेस सुरू होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रेल्वे प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आता राज्यांतर्गत पाच विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतलेला आहेत. या गाड्या मुंबईहुन सुटून पुणे, नागपूर, गोंदिया आणि सोलापूर या शहरांच्या दरम्यान दररोज चालवण्यात येणार आहेत. नऊ ऑक्टोबरपासून या गाड्या नियमित धावतील.

लॉकडाऊन सुरू झाल्यापासून महाराष्ट्रातील विविध शहरांना आणि जिल्ह्यांना जोडणाऱ्या रेल्वे बंद ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, अनलॉक ५ च्या आदेशामध्ये राज्यांतर्गत रेल्वे वाहतूक तात्काळ सुरू करावी, असे महाराष्ट्र सरकारने सांगितले होते. हे आदेश मिळाल्यानंतर मध्य रेल्वेने राज्यांतर्गत रेल्वे पुन्हा सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार केले. हे प्रस्तााव रेल्वे बोर्डाकडे पाठवण्यात आले. रेल्वे बोर्डाने गृह मंत्रालयाशी सल्लामसलत करून पाच एक्सप्रेस चालवण्यासाठी मंजुरी दिली आहे. या एक्सप्रेस मध्य रेल्वेच्या सीएसएमटी स्थानकातून दररोज सोडण्यात येतील.

या ५ एक्सप्रेसमध्ये दोन एक्सप्रेस या मुंबई आणि पुणे या महत्त्वाच्या शहरांमध्ये धावणाऱ्या आहेत. यातील ०२१२३/०२१२४ ही एक्सप्रेस डेक्कन क्वीन एक्सप्रेस प्रमाणेच त्याच वेळापत्रकानुसार मुंबई ते पुणे दरम्यान धावेल. तसेच ०२०१५/०२०१६ ही इंद्रायणी एक्सप्रेसच्या वेळापत्रकानुसार दररोज मुंबई ते पुणे दरम्यान धावेल. अश्या दोन एक्सप्रेस मुंबई पुणे या दरम्यान चालवण्यात येणार आहेत. तिसरी एक्सप्रेस ०२१८९ असून ती मुंबई ते नागपूर दरम्यान चालवली जाणार आहे. ही एक्सप्रेस मुंबई-नागपूर दुरंतो एक्सप्रेसच्या वेळापत्रकानुसार चालवली जाईल. मुंबई आणि गोंदिया दरम्यान ०२१०५ ही एक्सप्रेस चालवली जाईल. जी विदर्भ ..../२

# पोलादपूरला एमआयडीसी होण्यासाठी आ.गोगावले यांचेही उद्योगमंत्री ना.देसाई यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : पोलादपूर तालुक्यात रोजगारनिर्मितीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून एमआयडीसीची मागणी, सरकारची घोषणा आणि शेतकऱ्यांचा विरोध अशा घटनाक्रमांनंतर एमआयडीसी दरवेळी बारगळत असल्याच्या बातमीची दखल घेत महाड विधानसभा मतदार संघाचे आ. भरत गोगावले यांनी उद्योगमंत्री ना.देसाई यांना निवेदन देत तुर्भे खुर्द व वझरवाडी परिसरात नवीन एमआयडीसीची मागणी केली आहे. यापुर्वी माजी आमदार माणिक जगताप यांनीही याच परिसरामध्ये मिनी एमआयडीसीची मागणी तत्कालीन उद्योगमंत्री नारायण राणे यांना तत्कालीन सभापती दिलीप भागवत यांच्या निवेदनाद्वारे केली होती.

पोलादपूर तालुक्यात सोशल मिडीयावरून पुन्हा एमआयडीसीच्या मागणीचा पुनरूच्चार सुरू झाल्याचे सविस्तर वृत्त प्रस्तुत प्रतिनिधीने प्रसिध्द करून तालुक्यातील लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या बेरोजगारांच्या संख्येबाबत लक्ष्य वेधले होते. यानंतर तालुक्यात या बातमीची सांगोपांग चर्चा घडून आली आणि ज्याठिकाणी माजी आमदार माणिक जगताप यांनी मिनी एमआयडीसी उभारण्याची मागणी तत्कालीन उद्योगमंत्री नारायण राणे यांच्याकडे केली होती. त्याच तुर्भे खुर्द व वझरवाडी परिसरामध्ये नवीन एमआयडीसी उभारण्यासाठी आ.गोगावले यांनी विद्यमान उद्योगमंत्री ना. सुभाष देसाई यांना ५ ऑक्टोबर २०२० रोजी निवेदन देऊन पाठपुरावा केला आहे. ..../२

# रास्त भाव धान्य दुकानदार व कुटुंबियांना 'कोरोना योद्धा' म्हणून गौरविण्यात यावे : भरत पाटील

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशात व राज्यात गेली सहा महिने कोरोनाने थैमान घातले असल्याने अशा कठीण प्रसंगात देखील रास्त भाव धान्य दुकानदारांनी शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच नियमितपणे रेशनिंग धान्य वितरणाचे काम अखंड सुरू ठेवले. महाराष्ट्रातील अनेक दुकानदार व मदतनीस हे कोरोनाने संक्रमीत होवून मृत्यूमुखी देखील पडले. अशा सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांच्या कार्याचा सरकारने 'कोरोना योद्धा' म्हणून गौरव करावा, अशी मागणी पनवेल रास्त भाव धान्य दुकानदार वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पोलीस कर्मचारी, शासकीय कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी, सफाई कर्मचारी त्याचबरोबर गाव पातळीवर संपूर्ण कुटुंबासह सहा-सात महिने नियमितपणे गरीब लोकांना रेशनिंगचे धान्य वितरण करणारे सेवा भावी दुकानदार यांचा प्रामुख्याने 'कोरोना योद्धा' म्हणून सत्कार होणे आवश्यक आहे. परंतु सरकारी यंत्रणेद्वारे शासनाला योग्य ती माहिती उपलब्ध होत नसल्याने मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांचा व दुकानदारांचा तसेच कुटुंबियांचा 'कोरोना योद्धा' म्हणून सन्मान होत नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात व तालुक्यात आतापर्यंत सार्वजनिक रेशनिंग दुकानदार अल्प मोबदल्यात रास्त भाव धान्य दुकानाचा कारभार पाहत असतात. शासकीय धान्याचे वितरण करताना त्यांचा सरळ-सरळ संबंध नागरिकांशी होत असतो. त्यामुळे कोरोना संक्रमणाचा धोका रास्त भाव धान्य दुकानदारांना मोठ्या प्रमाणामध्ये असतो. महाराष्ट्रातील तसेच पनवेल तालुक्यातील देखील अनेक दुकानदार कोरोना संक्रमित असून जवळपास ३५ ते ४० दुकानदार व मदतनीस यांचा कोरोना महामारीत



मृत्यू देखील झाला आहे. परंतु अपुऱ्या शासकीय माहितीद्वारे ते शहिद शासनाच्या सवलती व मदतीपासून अद्याप दूर आहेत. त्यामुळे कोरोना प्रादुर्भावाने संक्रमित झालेल्या तसेच मृत्यूमुखी पडलेल्या रास्त भाव धान्य दुकानदारांना शासकीय भरपाई देवून कोरोना योद्धा म्हणून प्रमाणित करण्यात यावे, अशी मागणी पनवेल रास्त भाव धान्य दुकानदार वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# कोरोना आणि करविवाद

कोरोनामुळे जी अनपेक्षित आणि अकल्पित संकटे उभी ठाकली आहेत, त्यातील एक संकट म्हणजेजीएसटीम्हणजे वस्तू आणि सेवा कराचे संकलन व वाटप हे एक आहे. मुळात जीएसटी ही करप्रणाली ठरविताना, लागू करताना आणि अमलात आणताना केंद्र सरकार व राज्ये यांचे सतत मतभेद होत आले आहेत. जीएसटी संकलनाचे व वाटपाचे सूत्र अजूनही संपूर्णपणे विनातक्रार काम करू लागलेच नव्हते. अशावेळी, करोनाच्या संकटाने हा जीएसटीचा पट पुरता उधळून दिला आहे. त्यावरचा मार्ग काढताना केंद्र सरकारने आणि विशेषत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अतिशय सामंजस्याची, उदार भूमिका घेणे अपेक्षित होते. पण 'ॲक्ट ऑफ गॉड' अशी करोना संकटाची संभावना करून केंद्राची राज्यांप्रती असणारी आर्थिक जबाबदारी झटकण्याचा त्यांचा मनोदय त्यांच्या पदाला आणि जबाबदारीला शोभा देणारा नव्हता. या पार्श्वभूमीवर जीएसटी कौन्सिलच्या सोमवारी झालेल्या बैठकीत राज्ये आणि केंद्र सरकार यांच्यात जे मतभेद झाले आहेत, ते अजून टोकाला गेले नसले तरी भारताच्या संघराज्यीय रचनेला गेल्या काही दिवसांत जे धक्के बसत आहेत, त्यातला हाही एक छोटासा धक्का आहे. या बैठकीतला सगळ्यांत महत्त्वाचा मुद्दा राज्यांचे जीएसटी संकलनातील होणारे नुकसान कसे भरून काढायचे आणि त्यासाठी केंद्र सरकारने राज्यांना कशी आर्थिक मदत करायची, हाच होता. त्यावरून जी फूट पडलेली दिसते आहे, त्यात केंद्र सरकारच्या सूचना मान्य करणारी वीस राज्ये एकीकडे आणि केंद्र सरकारची सूचना मान्य नसणारी दहा राज्ये अशी विभागणी आहे. या विभागणीत महाराष्ट्र सरकारची भूमिका ही केंद्र सरकारच्या सूचनेच्या मागे उभी राहणारी आहे, हे विशेष. बाकी काँग्रेसशासित राज्ये दुसऱ्या बाजूला आहेत. अर्थात, आर्थिक प्रश्नांवर अशा प्रकारची फूट असणे, हेच मुळात योग्य नाही. त्यामुळेच, जीएसटी भरपाईचा मुद्दा मताला न टाकता तो पुढच्या बैठकीपर्यंत लांबणीवर टाकण्यात आला. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी हे राजकीय शहाणपण या बैठकीत दाखवले, हे बरे झाले. गेले सहा महिने अर्थव्यवस्था संकटात आहे. राज्यांपुढचा खरा प्रश्न आहे तो, जीएसटीमधील तूट भरून काढताना त्यांनी नेमके किती कर्ज घ्यायचे? त्याचे व्याज कसे फेडायचे आणि हे कर्जाचे ओझे डोक्यावर बाळगत विकासाच्या योजना कशा राबवायच्या? हे प्रश्न योग्य आहेत आणि केंद्र सरकारने याबाबत काहीशी उदार भूमिका घेणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्यांनी भरपाईसाठी कर्ज घ्यावे आणि ते फेडण्यासाठी उपकर म्हणजे सेस बसवावा. याचाच अर्थ, जीएसटीचा दर वाढणार. यात राज्यांचे म्हणणे असे आहे की, आम्हाला नव्या कर्जाच्या सापळ्यात गुंतवण्याऐवजी केंद्र सरकारने आम्हाला सरळ जीएसटी संकलनामधील तूट भरून द्यावी. त्यासाठी नवी कर्जे घ्यायला लावू नये. ही मागणी चूक नाही. मात्र, यासाठी केंद्र सरकारला चलन फुगवट्याचा धोका पत्करून राज्यांना पैसा द्यावा लागेल. पुढच्या जीएसटी बैठकीत या दृष्टीने काही पावले टाकायची असतील तर त्यासाठी आता पंतप्रधानांना पुढाकार घ्यावा लागेल. 'आत्ता कर्जे घ्या. ती सावकाशीने फेडा. किंवा ती फेडण्यासाठी पुढची पाच वर्षे आपण उपकराची तरतूद करूया' या सूचना कागदोपत्री योग्य असल्या तरी विशेषत: गरीब राज्यांमधील विकासाच्या साऱ्या योजना पुढची काही वर्षे यामुळे संकटात सापडू शकतात. केंद्र आणि राज्ये यांच्या आर्थिक शक्तीची जशी तुलना होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे बाजारातून केंद्र सरकारने केलेली कर्जउभारणी आणि उडिशा अथवा हिमाचलसारख्या गरीब राज्यांनी केलेली कर्जउभारणी यांच्यात फरक असतो. तसेच, केंद्र सरकारची प्रतिहमी असल्यावर व्याजदरातही पुष्कळ सूट मिळू शकते. याउलट, राज्यांना काहीशा चढ्या दराने कर्जे घ्यावी लागू शकतात. राज्ये व्याजाची रक्कम जितकी जास्त भरणार, तितकी त्यांच्या विकास योजनांना कात्री लागणार, हे काही वेगळे सांगायची गरज नाही. देशाचा विचार केला तर सगळ्या राज्यांना मिळून या आर्थिक वर्षात दोन लाख ३५ हजार कोटी रुपयांची जीएसटी तूट सोसावी लागेल, असा अंदाज करण्यात आला. यातील एक लाख ६५ हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई केंद्र सरकारने आजवर दिली आहे. पण जी उरलेली रक्कम आहे, ती उभी करतानाही अनेक राज्यांचे अर्थसंकल्प कोलमडू शकतात आणि त्यांच्याकडे कदाचित वेतनासाठीही पैसे उरणार नाहीत, अशी स्थिती येऊ शकते. महाराष्ट्राला सध्या सुमारे २३ हजार कोटी रुपयांची तूट आहे. ही म्हटले तर केंद्राकडून येणारी थकबाकी आहे. मात्र, ही रक्कम तुम्ही कर्जरूपाने उभी करा, ही केंद्र सरकारची सूचना आत्ता तरी महाराष्ट्र सरकारने स्वीकारलेली दिसते. याचा अर्थ, महाराष्ट्र सरकारची भूमिका ही देशातील इतर काँग्रेसशासित राज्यांसोबत जाण्याची नसून भाजप व मित्रपक्षांची सत्ता असणाऱ्या राज्यांसमवेत जाण्याची दिसते. कदाचित, जीएसटी कौन्सिलच्या पुढच्या बैठकीत काही एक सर्वमान्य तोडगा निघून सर्वच राज्यांची व केंद्र सरकारची भूमिका समान होण्याचीही शक्यता आहे. मात्र, यातला खरा मुद्दा हा खरिपाचे विक्रमी पीक येत असताना त्याचा फायदा घेऊन एकूणच अर्थव्यवस्थेला गती देण्याचा आहे. तशी गती मिळाली तर आर्थिक वर्षातील उरलेल्या पाच महिन्यातील जीएसटीची आधी अंदाज केलेली तूट काहीशी कमी होऊ शकते. अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या या गतीचे भान ठेवून केंद्रीय अर्थखात्याने राज्यांना कर्ज घेण्याची सक्ती न करता स्वत:च्या तिजोरीतून भरपाई दिली तरी बिघडणार नाही. उलट, त्यामुळे अर्थव्यवस्था अधिक वेगाने रुळावर येईल.

# सिडकोचे सातशे पेक्षा जास्त सफाई कामगार असुरक्षित

## आझाद कामगार संघटनेचा सिडको भवनचे गेट अडवले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोकडे काम करणाऱ्या ७०० पेक्षा जास्त सफाई कामगारांना कोरोना काळात सेवा बजावत असताना कोणताही सुरक्षाकवच नाही. परिणाम संबंधितांना आपला जीव धोक्यात घालून काम करत असताना सुरक्षितता नाही. त्यामुळे संबंधितांना सुरक्षा विमा देण्याबरोबर इतर सुविधांसाठी आझाद कामगार संघटनेच्या वतीने सोमवारी एल्गार पुकारण्यात आला होता. कामगारांनी सिडको भवन च्या गेट समोर ठिय्या आंदोलन करीत प्राधिकरणाची लक्ष वेधले. याबाबत त्वरित प्रस्ताव तयार करून तो व्यवस्थापकीय संचालकांकडे पाठवला जाईल अशी ग्वाही अधिकाऱ्यांना दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.



सिडको अखत्यारित उलवे, करंजाडे आणि द्रोणागिरी या नोडमध्ये काम करणारे स्वच्छता विषयक कर्मचारी काम करतात. ते सिडकोचे कामगार आहेत. त्याचबरोबर पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील सर्व रेल्वे स्थानक सिडको मुख्यालय आणि इतर क्षेत्रीय कार्यालयात सफाई कामगार काम करतात. धूर फवारणी सह ७०० पेक्षा जास्त कामगार सिडकोकडे आहेत. त्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्राधिकरणाने सातत्याने दुर्लक्ष केले आहे. यासाठी आझाद कामगार संघटनेने कायम आवाज उठवला. कोरोना वैश्विक संकटात डॉक्टर, परिचारिका, पोलीस यांच्याबरोबरच सफाई कामगार सुद्धा कोविड यौध्दे म्हणून गणले जातात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारीत असलेल्या कामगारांना विमा सुरक्षा कवच दिला जात आहे. त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून साधने पुरवली जात आहेत. परंतु सिडकोकडे काम करणाऱ्या स्वच्छताविषयक कामगारांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे. राज्यातील सर्वात श्रीमंत महामंडळ असलेल्या सिडकोच्या सफाई कामगारांची सुरक्षितता रामभरोसे असल्याचे स्पष्ट झाले आहे. आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी सिडको भवन च्या गेट समोर ठिय्या आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. सामाजिक अंतर राखून कामगारांनी सिडकोच्या धोरणाचा निषेध नोंदवला. फलकाद्वारे आपल्या मागण्या सिडको समोर मांडल्या. सिडकोचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. बी. एस बावस्कर, सिडको रेल्वे प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता सुधाकर विसाळे, मुख्यालयाचे अधीक्षक अभियंता फुलारे यांनी कामगारांच्या वतीने महादेव वाघमारे यांना चर्चेस बोलवले, कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व मागण्यांबाबत सिडको सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या गाईडलाईन प्रमाणे प्रस्ताव तयार करून सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना पाठवणार असल्याचे अधिकार्यांकडून सांगण्यात आले.

# स्नेहल वाघमारे हिला नरौत्तम शेखसरीया एक्सलन्स अवॉर्ड प्रदान

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात सर्वगुणसंपन्न व गुणवत्ताधारक व्यक्तींची खान आहे. अशा तेजोमय व्यक्तिमत्वांमुळे सुधागडच्या शिरपेचात सातत्याने मानाचा तुरा खोवला जातो. सुधागड तालुक्यातील हातोंड गावची शौर्य कन्या स्नेहल राजेंद्र वाघमारे हिला नरौत्तम शेखसरीया एक्सलन्स अवॉर्ड व ५० हजार रोख बक्षीस मिळाले आहे. मुंबईचे पोलिस कमिशनर परमवीर सिंह यांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला आहे. पुरस्काराने प्रेरणा मिळते व प्रेरणेने राष्ट्र घडते. या सन्मानाने भविष्यात विविध क्षेत्रात जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे सन्मानार्थी स्नेहलने सांगितले. या सन्मानाने सुधागड हातोंडसारख्या डोंगर दर्याखोऱ्यात , दुर्गम भागात वसलेल्या छोट्या गावाचे नाव स्नेहलच्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचले आहे. त्यामुळे स्नेहलवर सर्व स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



नरौत्तम शेखसरीया फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने मुंबई पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उच शिक्षण घेत असलेल्या पाल्यांची त्यांची शैक्षणिक क्रीडा व सांस्कृतिक कामगिरी, सामाजिक योगदान आणि विशेष गुणात्मक दर्जा या संदर्भात मुलाखती घेण्यात आल्या होत्या. यात पहिल्या पाच मुलांची अंतिम निवड करण्यात आली. यामध्ये स्नेहल वाघमारे अव्वल ठरली आहे.

द्या एक मदतीचा हात उपक्रमाद्वारे अनेक गोर गरीब मुलांना शैक्षणिक साथ देणारे मुंबई पोलिस दलातील बिनतारी संदेश विभागातील पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे हे स्नेहलचे वडील आहेत. त्यांचे मूळ गाव सुधागड तालुक्यातील हातोंड हे आहे. सुधागड व रायगड जिल्ह्यात ते त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सेवाभावी कार्यात अग्रेसर आहेत. त्यांचाच वारसा स्नेहल पुढे नेत आहे. प्रतिभासंपन्न स्नेहलच्या उतुंग कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्नेहल ची बालवयातील कामगिरी दैदिप्यमान व कौतुकास्पद अशीच आहे. स्नेहलने खोपोली येथे धावत्या रेल्वेतून पडणाऱ्या एका प्रवाशाचे प्राण वाचविले होते. या साहसा बद्दल तिला बुद्ध धम्म प्रचार समितीच्या वतीने शौर्य कन्या पुरस्कार देण्यात आला होता. तसेच नवोदय विद्यालयात विविध स्पर्धेत गोल्ड मेडल मिळविल्याने ती गोल्डन गर्ल म्हणून ओळखली जात होती. मी सावित्रीबाई फुले बोलतेय हा एक पात्री कार्यक्रम देखील ती करत आहे.

# केअर पॉईंट हॉस्पिटल मधून कोरोना पॉझिटीव्ह रुग्णाचे पलायन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत चालला असतानाच एका कोरोना पॉझिटीव्ह रुग्णानी सायंकाळी पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. यापूर्वीसुद्धा एक पॉझिटीव्ह रुग्णालयातून पलायन केले होते.

उरण येथील केअर पॉईंट हॉस्पिटलमध्ये कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण उपचार घेत आहेत. यातील एक कोरोना पॉझिटीव्ह रुगणांनी हॉस्पिटल मधून काल सायंकाळी पळून गेल्याची घटना उघडकीस आली आहे.

यापूर्वीसुद्धा आणखीन एका कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण पळून जाण्याचा घटना घडली होती. काल अशाच प्रकारे कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण रुग्णालयातुन पळून गेल्याची घटना घडली आहे.

याबाबत प्रशासन यंत्रणेकडे विचारणा केली असता कोणीही माहिती देत नाही. मात्र कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण पळालाच्या घटनेला रुग्णालयातील अधिकारी वर्ग याला दुजोरा देत असून त्याचा तपास सुरू असल्याचे सांगतात. केअर पॉईंट हॉस्पिटलमधून कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण पळून गेल्याची घटना घडल्याने उरणच्या जनतेत भीतीचे सावट पसरले आहे.

दैनिक अन्यायाचा प्रतिकार रायगड नगरी महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
या वृत्तपत्रात वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा
फोन नं. : 022-27469434 / 9619737911 / 9619979706
कार्यालय : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, जुने रतन टॉकीज समोर टिळक रोड, पनवेल
Email : raigad.nagari@gmail.com

# यावर्षी गरबा नृत्य नाही....तरुण-तरुणींचा हिरमोड ; व्यावसायिकांवर मोठा परिणाम

**दै.रायगड नगरी । विश्वास निकम**

**गोवे-कोलाड** : मार्च मध्ये कोरोनाने शिरकाव केला आणि अनेक लहान-मोठ्या व्यापाऱ्यांना तसेच मोलमजुरी करणाऱ्यांना देशोधडीला लावले ते आज तगायत. अनेकांचे आराध्य दैवत गणपती सण सुद्धा सुना सुना गेला. त्यानंतर आता १७ ऑक्टोबरला घटस्थापना आहे. या दिवसापासून नऊ दिवस सर्वत्र गरबा नृत्याचा कार्यक्रम असतो. नऊ दिवस तरुण-तरुणी, लहान मुलं अगदी उत्साहाने आपली कला सादर करतात. दरवर्षी या कालावधीमध्ये पावसाचे मोठे सावट असते. तरीसुद्धा दोन-चार दिवस मिळत होते त्यातच सर्वजण गरबा नृत्याची मजा लुटत होते. नऊ दिवस गरबा नृत्याचा कार्यक्रम सादर केला जातो यामध्ये नऊ दिवस वेगवेगळे खाद्यपदार्थ आणून ते उपस्थितांना दिले जातात. त्यामध्ये लहान व्यावसायिकांचा धंदा चांगला व्हायचा.

मात्र यावर्षी कोरोनाच्या सावटामुळे गरबा नृत्याचा कार्यक्रम कुठेही होणार नसल्यामुळे अनेकांचा हिरमोड झाला असून अनेक लहान व्यवसायिकांवर परिणाम झाला आहे. पिढ्यान पिढ्या चालत असलेला हा परंपरिक सण यावर्षी खंडित झाला आहे. जुनी जाणकर माणसे सांगतात की, आमच्या जन्मापासून नाही तर आमच्या पणजोबांच्या काळातही असा महाभयंकर प्रकार कधी घडला नव्हता. कोणते सण साजरे झाले नाहीत असा प्रकार कधीच घडलं नाही. या कोरोनाने आज तगायत अनेकांवर मोठे संकट आणले अनेकांना देशोधडीला लावले. हजारोंना आपले जीव गमवावे लागले आणि अनेकांचे संसार ही मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त केले. अनेक सणांचा आनंद हिरावून घेतला. अशी दहशत या कोरोनाने निर्माण केली आहे. गरबा नृत्याच्या वेळी अनेक ठिकाणी तरुण-तरुणी आणि इतर व्यक्ती एकत्र येऊन आनंद लुटतात.

दसऱ्याच्या दिवशी सर्वजण एकत्र येतात तसेच घरोघरी जावून आपट्याची पान देऊन सोनं देण्याचा कार्यक्रम करतात. या वर्षी मात्र असे दिसणार नाही. प्रत्येक जण आप आपल्या घरात राहून जुन्या गोष्टींना उजाळा देणार आहे. एकंदरीत या कोरोनाच्या सावटामुळे सर्वत्र गरबा नृत्यावर मोठे सावट आले असून शुकशुकाट दिसणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रायगड पोलिसांकडून पर्दाफाश

असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडून एकूण २० मोबाईल आय.डी. यांची माहिती मिळाली असून त्यापैकी एकूण ४ मोबाईल आय.डी. या सट्टेबाजांनी सट्टा खेळण्याकरिता वापरल्याची माहिती तपासादरम्यान मिळाली आहे.

या मोबाईल फोनमध्ये आढळून आलेले सिमकार्ड इतर इसमांच्या नावांवर नोंदणीकृत करून घेतले असल्याचेही तपासामध्ये निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने कर्जत पोलीस ठाणे येथे भा.द.वि.सं. क. ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम ४(अ), ५ तसेच इंडियन टेलिग्राफ ॲक्ट १९८५ चे कलम २५(क) व माहिती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासामध्ये वेगवेगळ्या बुकी व त्यांच्या मध्यस्थ अशा एकूण ११ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. त्या सर्वांची न्यायालयाने ११ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

या गुन्ह्यात सहभाग असलेले ५ जण फरार असून त्यापैकी काही महत्वाचे बुकी हे गुजरात, बेंगलोर व दुबई येथे असल्याची माहिती मिळाली आहे. फरार असणार्या बुकींच्या शोधार्थ खास तपास पथकांची नियुक्ती करण्यात आलेली असून ही पथके गुजरात व बेंगलोर या ठिकाणी रवाना करण्यात आलेली आहेत. तसेच तपासामध्ये ऑनलाईन सट्टा खेळण्याकरिता व खेळविण्याकरिता वापरत असलेले एकूण १६ मोबाईल फोन्स जप्त करण्यात आले आहेत.

## निधी चौधरी यांचे सुरक्षा पट्टयाच्या मोजणीचे निर्देश

निधी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी नेव्हल अपार्टमेंट डेपो, करंजा उरण यांच्या सुरक्षा पट्टयाच्या मोजणी संदर्भात निर्देश दिले होते. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशनाच्या अनुषंगाने आज तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी तहसील कार्यालयात यावर विचारविनिमय करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला नगराध्यक्षा सायली म्हात्रे, सरपंच अनंत घरत, कविता पाटील, एनएडीचे अधिकारी वर्ग उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी सेफ्टी झोन संदर्भात स्थानिकांची घर व जमीन बचाव समिती आहे. सदर समीतीला घेऊन बैठकीचे आयोजन करण्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे या संदर्भात लवकरच बैठक घेण्याचे ठरले असल्याचे समजते. जिल्हाधिकारी यांनी पुन्हा मोजणी करण्याचे निर्देश दिल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## रिया चक्रवतीची भायखळा जेलमधून झाली सुटका

रियाची तब्बल एका महिन्यानंतर सुटका झाली.

एक अभिनेत्री असलेल्या रियाला भायखळा कारागृहात पंख्याशिवाय आणि जमिनीवर चढईवर झोपावं लागलं होतं. मागील सुनावणीमध्ये विशेष न्यायालयाने रिया चक्रवर्तीची न्यायालयीन कोठडी ६ ऑक्टोबरपर्यंत वाढवली होती. नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने रिया चक्रवर्ती, शौविक चक्रवर्ती आणि इतर १८ आरोपींच्या जामीन अर्जाला विरोध करत त्यांचा जामीन अर्ज फेटाळायला सांगितला होता. मात्र, मुंबई उच्च न्यायलयाने रिया चक्रवर्तीसह, सॅम्युल मिरांडा आणि दिपेश सावंत यांना जामीन मंजूर केला आहे. रियाला १ लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन देण्यात आला असून पुढील १० दिवस ११ ते ५ या वेळेत रियाला जवळील पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, शौविक चक्रवर्ती आणि परिवार यांना जामीन देण्यास न्यायलयाने नकार दिला आहे.

## मनसेच्या पद्धतीने कारवाई करावी लागेल : राज ठाकरे

असा इशारा मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मायक्रो फायनान्स कंपन्या आणि ठाकरे सरकारला दिला आहे.

दरम्यान, पूर्ण ग्रामीण भागात अर्थव्यवस्था गेले ६ महिने ठप्प आहे आणि अजूनही अर्थव्यवस्थेला उभारी येण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत, त्यामुळे महिला कर्जाचे हफ्ते भरु शकतील याची शक्यता नाही, त्यामुळे महिलांचे कर्ज माफ करण्यासाठीही सरकारने पाऊलं उचलायला हवीत, यात मायक्रो फायनान्स कंपन्यांनी महिला बचत गटाच्या महिलांकडून विमा उतरवतो हे सांगून त्या विम्याच्या हफ्ता गोळा केला आहे, पण जेव्हा व्यवसाय ठप्प आहे आणि कर्जाचे हफ्ते देणं महिलांना शक्य नाही, अशा वेळेस या महिला विम्याच्या पॉलिसीची मागणी करत आहेत तेव्हा मायक्रो फायनान्स कंपन्या विम्याचे कागदपत्रे देत नाही, महिलांनी जरी विम्याची रक्कम अदा केली असली तरी विमाच उतरवला गेला नाहीये अशी शंका येत आहे, यामुळे महिलांना विम्याचे कागदपत्र तर मिळायलाच हवेत पण त्यांना विमा कवचाचा लाभ दखील मिळायला हवा अशी मागणी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी पत्रातून केली आहे.

## राज्यांतर्गत ५ एक्सप्रेस सुरू होणार

एक्सप्रेसच्या धर्तीवर त्याच वेळापत्रकात चालवण्यात येईल. तसेच मुंबई आणि सोलापूर या शहरांदरम्यान ०२११५/०२११६ ही एक्सप्रेस सिद्धेश्वर एक्सप्रेस नुसार चालवण्यात येणार आहे.

या सर्व गाड्यांचे आरक्षण आठ तारखेपासून सुरु होणार असून तिकीट खिडक्यांवर आणि ऑनलाइन उपलब्ध असेल. या गाड्या चालवताना काही स्थानके वगळण्यात देखील आली आहेत. केवळ महत्त्वाच्या स्थानकांवर या एक्सप्रेस गाड्या थांबतील अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे. तसेच ज्यांच्याकडे आरक्षित तिकीट असेल त्यांनाच प्रवासाची मुभा आहे, अनारक्षित तिकीट घेऊन प्रवास करता येणार नाही. हा प्रवास करताना सोशल डिस्टन्सिंग पाळावे आणि स्वतःसोबत इतर प्रवाशांची देखील काळजी घ्यावी असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

## आ.गोगावले यांचेही उद्योगमंत्री ना.देसाई यांना निवेदन

यावर्षाच्या सुरूवातीला ३ मार्च २०२० रोजीच पोलादपूर तालुक्यातील महाड विधानसभा संपर्कप्रमुख सुभाष पवार, पोलादपूर तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव आणि विधानसभा समन्वयक राजू रिंगे यांनी विद्यमान उद्योगमंत्री ना. सुभाष देसाई यांना दिलेल्या निवेदनाची प्रत सोशल मिडीयावरून गेल्या महिन्यांत व्हायरल होऊ लागली होती. या पत्राची दखल घेत एमआयडीसीचे रिजनल ऑफिसर यांनी पत्रव्यवहाराने पाठपुरावा करून पोलादपूर तालुक्यासाठी स्वतंत्र एमआयडीसी सुरू होण्यासाठी डेप्युटी चिफ एक्झीक्युटीव्ह इंजिनियर अंधेरी यांना विशेष आग्रह ४ जून २०२० रोजीच्या पत्राने केला आहे. आता याचसंदर्भात आ.भरत गोगावले यांनीही पाठपुरावा केल्याने रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे या उद्योगराज्य मंत्री असल्याने कोणती भूमिका घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मोबाईल खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलेच्या हातातील मोबाईल खेचून दोघेजण पसार झाल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे.

कळंबोली वसाहतीतील सेक्टर ९ येथील नेहा जैसवाल या औषध घेण्याकरिता डी मार्ट समोरील वेलनेस मेडीकल येथे गेल्या होत्या. औषध घेवून त्या फोनवर बोलत असताना मोटार सायकलीवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमापैकी एका इसमाने त्यांच्या हातातील फोन जबरदस्तीने खेचून घेवून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विद्यावेतनापासून प्रकल्पग्रस्तांची मुले वंचित

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको क्षेत्रातील पनवेल व उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना चालू शैक्षणिक वर्षाचे विद्या-वेतन देण्याचा निर्णय सिडको व्यवस्थापनाने घेतला असला, तरी योजनेतून नवी मुंबई महापालिका हद्दीतील प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना विद्यावेतनापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे ठाणे तालुक्यातील सिडको प्रकल्पग्रस्तांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी विद्यावेतन दिले जात होते. मात्र, सिडकोने हे विद्यावेतन पनवेल व उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना देण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. त्यात नवी मुंबई महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांचा उल्लेखही नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी आहे. नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी बेला-पूरपासून ऐरोलीपर्यंतच्या २९ गावांच्या शेतकऱ्यांनी सर्वप्रथम सिडकोला जमिनी कवडीमोल भावाने दिल्या आहेत. त्या मोबदल्यात सिडकोने प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या पाल्यांसाठी काही कल्याणकारी योजना सुरू केल्या. त्यामध्ये विद्यावेतन योजनेचाही समावेश आहे.

## धूळखात पडली पदाधिकाऱ्यांची वाहने

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नवी मुंबई महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक झालेली नसून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्त जबाबदारी पार पाडत आहेत. उपमहापौर, तसेच इतर पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्याने त्यांना देण्यात आलेली वाहने महापालिकेकडे जमा करण्यात आली असून, वापर आणि स्वच्छता नसल्याने लाखो रुपयांची वाहने धूळखात पडली आहेत.

महापालिकेतील उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता आदी पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपला आहे. या पदाधिकाऱ्यांना महापालिकेच्या वतीने वापरासाठी देण्यात आलेली वाहने महापालिकेकडे जमा करण्यात आली आहेत. महापालिका मुख्यालयातील पार्किंगमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून सदर वाहने एकाच जागेवर उभी असून, अनेक वाहनांची नियमित स्वच्छताही केली जात नाही. तसेच संबधित विभागाचे लक्ष नाही. त्यामुळे वाहनांवर धूळ साचली असून, बंद असलेल्या वाहनांमध्ये बिघाड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## अवाजवी वीजबिल कमी करा अन्यथा रस्त्यावर उतरु : अनंत गुरव

**दै.रायगड नगरी । दांडगुरी**

लॉकडाउनच्या काळात अनेकांचे उत्पन्न बुडाले. घर-गुती खर्च भागवणेही कठीण झाले आहे. अशा स्थितीमध्ये महावितरणने वीजदरवाढ केली आहे. गेल्या तीन महिन्यांचे बिल एकत्र दिले असून, एप्रिलपासून ही वाढ करण्यात आली आहे. वीज दरात केलेली वाढ, वाढलेले बिल पाहून ग्राहकांना धक्काच बसला आहे. वीज बिल कमी करा नाहीतर रस्त्यावर उतरण्याचा ईशारा नगरसेवक अनंत गुरव यांनी दिला आहे.



कोरोनामुळे मार्च ते मे या तीन महिन्यांचे मीटर तपासणी केली नाही. त्यानंतर ३ जून रोजी निसर्ग चक्रीवादळ आलं त्यानंतरच्या काळात एक ते दोन महिने वीज पुरवठा सुरळीत नव्हता. आता लॉकडाऊन शिथिल केल्यामुळे तपासणी केली असून बिल वाटप केले जात आहे. तीन महिन्यांचे बिल एकत्र आले आहे. महिन्याला तीनशे रुपये बिल येणाऱ्यांना तीन महिन्यांचे दोन हजार बिल आले आहे. सरासरी बिल आकारणी केली जात असली तरी एप्रिलमध्ये वाढलेले वीज दरही बिल वाढीस कारण आहे. लॉकडाऊनमध्ये अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशा स्थितीत दरवाढ केल्यामुळे ग्राहकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. सरासरी बिल दळून अक्षरशः ग्राहकांची फसवणूक महावितरण करत आहे. अवाजवी बिल मनमानी करभरप्रेमाणे आकारण्यात आले आहे. अवाजवी बिल तात्काळ रद्द करून नियमानुसार वीज बिलाची आकारणी करण्यात यावी अशी मागणी शिव-सेना गटनेते नगरसेवक अनंत गुरव यांनी महावितरण कार्यालयाला लेखी पत्राद्वारे केली आहे. अन्यथा जन-तेतील संताप उफाळून रस्त्यावर उतरल्यास व त्याचे दायित्व आपले असेल असा इशारा दिला आहे.

# नवरात्रोत्सवाचे वेध ! तरूणांची घोर निराशा

**दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर**

**आगरदांडा** : गणेशोत्सवानंतर भाविकांना आता नवरात्रौत्सवाचे वेध लागले आसुन १७ऑक्टोबरला रोजी देवीची घटस्थापना करण्यात येणार आहे. देवीच्या मुर्तीवर हात फरविण्यासाठी लगबग मुर्तीकारांची सुरू आहे.मुरुड कुभांरवाड्यातील अच्युत चव्हाण आकर्षक देवीच्या मुर्ती घडवण्याचा कला आनेक वर्ष करीत आसुन शहरातील व पंचक्रोशीत देवीची आसते. मुरूड पोलीस ठाणे हद्दतील सार्वजनिक ५६ व खाजगी१३अशा एकुण ६९ देवीची घरगुती प्रमाणे स्थापना केली जाते. तसेच पारंपारिक पध्दतीने पुजा केली जाते.

नवरात्रौत्सवामध्ये लागणा-या वस्तुची बाजारपेठ सजु लागली या उत्सवात देवीची नऊ दिवस पुजा केली जाते त्यासाठी लागणारे साहित्य खण, वेणी, कापुर, धुप, व इतर वस्तुनी बाजारपेठेत सुनेसुने वाटु लागले आहे. यंदा गरबा, दांडिया कार्यक्रमावर बंदी घालण्यात आल्याने तरूणांनी घोर निराशा झाली आसुन नाराजी व्यक्ती केली आहे.

कोरोनामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थिती लक्षात घेता यंदा नवरात्रौत्सव, दुर्गापूजा आणि दसरा सण कसा साजरा करावा, याबाबत राज्य सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. याबाबत राज्य सरकारना मार्गदर्शक सूचना



जाहीर केल्या आहेत.

सार्वजनिक नवरात्रोत्सवासाठी मंडळांनी नगरपरिषद /स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धो-रणानुसार यथोचित पूर्वपरवनागी घेणे आवश्यक राहील., कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता तसेच न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश आणि नगरपालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत., या वर्षांचा नवरात्र-ोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणे अपेक्षित

> विसर्जनाच्या तारखेस जर घरगुती तसेच सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाचा परिसर प्रतिबंधित क्षेत्रात असेल तर, मूर्ती विसर्जन सार्वजनिक ठिकाणी करण्यास मनाई असेल., कोविड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित नगरपालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष उत्सव सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिद्ध झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे. अश्या अटी शर्ती दिल्याने भक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे.

असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक देवी मुर्तीची सजावट त्या अनुषंगाने करण्यात यावी., देवीच्या मुर्तीची उंची सार्वजनिक मंडळांकरिता ४ फूट व घरगुती देवीच्या मुर्तीची उंची २ फूटांच्या मर्यादेत असावी., नवरात्रोत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी. तसेच माझे कुटुंब माझी जबाबदारी' या मोहिमेबाबत देखील जनजागृती करण्यात यावी., गरबा, दांडिया व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करु नयेत. त्याऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृति करण्यात यावी., आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदीचे पालन करण्यात यावे., प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सिंग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे., देवीच्या आगमन व विसर्जन मिरवणुका काढण्यात येऊ नयेत, विसर्जनाच्या पारंपारिक पद्धतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे., देवी मुर्तीच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नये.,मंडपात एकावेळी ५ पेक्षा जास्त कार्यकत्यांची उपस्थिती नसावी. तसेच मंडपामध्ये खाद्यपदार्थ अथवा पेयपानाची व्यवस्था करण्यास मनाई असेल.,

## केवळ प्रतिक्षा अर्ध चंद्र भाकरीची : नाका कामगारांची अवस्था बिकट



**दै.रायगड नगरी । उरण**

मंदी आणि केवळ मंदी कोरोनामुळे अनेक व्यवसाय, कंपन्या मंदीच्या खाईत लोटल्या गेल्या. याचा थेट परिणाम तेथे काम करीत असलेल्या कामगारांवर झाला आहे. अनेकांना कामावरुन कमी करण्यात आली आहे. बांधकाम व्यवसायालाही अवकळा आली असल्यामुळे येथे काम करणार्या नाका मजुरांनासुद्धा हाताला काम मिळेनासे झाले आहे.

त्यामुळे हे नाका मजूर दिवसभर अर्धचंद्र भाकरीच्या प्रतीक्षेत कोणी ठेकेदार येईल आणि आपल्याला कामावर नेईल, या आशेने तासन्तास वाट पाहत बसल्याचे केविलवाणे चित्र नजरेस पडत आहे.

ज्या काही लोकांच्या नोकर्या गेल्या किंवा लोकल प्रवासी सेवा बंद असल्याने कंत्राटी कामगारांना कामावर जाणे शक्य होत नाही आणि ज्यांच्याकडे थोडीफार जमापुंजी होती, त्यांनी मनातील संकोच बाजूला सारत मुख्य रत्यांच्या दुतर्फी जमेल ते व्यवसाय करण्यास सुरुवात केली आहे.

कोणी टीपॉयवर मक्याचे कणस विकायला घेऊन बसलाय, तर कोणी भाज्या, कांदे, बटाटे तर काहींनी कटलरी सामान. मात्र कोरोनाच्या काळात बहुतांश नागरिकांचे खिसे रिकामे झाल्याने खरेदीला जोर नाही. नागरिक जे फारच गरजेचे आहे, तेच माफक प्रमाणात खरेदी करीत आहे. त्यामुळे बहुतांश व्यावसायिकांना दिवस दिवस ग्राहकांच्या प्रतिक्षेत घालवावा लागत आहे.

## खा.सुनिल तटकरे यांच्या हस्ते प्राचार्य रमेश मोसे यांना पुरस्कार प्रदान



**दै.रायगड नगरी । वाकण**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहा येथील मेहेंदळे हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक ते प्राचार्य म्हणून यशस्वी मजल मारली आहे. याबरोबरच ते रोहा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष, कोकण एज्युकेशन सोसायटी अलिबाग पतपेढी चे संचालक आहेत. त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधा व शैक्षणिक साधने विविध फाउंडेशन तर्फे उपलब्ध करून दिली. त्यांना गरीब व गरजू विद्यार्थ्यांना प्रति नेहमीच तळमळ असल्यामुळे ते त्यांच्या अडचणीसाठी नेहमीच कार्यतत्पर असतात. आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंना नेहमीच मदत करत असून ते खेळाडूंना किट्स, युनिफॉर्म, प्रथमोपचार व मार्गदर्शक उपलब्ध करून देतात, त्यामुळे मेहेंदळे हायस्कूलचे विद्यार्थी दरवर्षी जिल्हा व राज्यपातळीवर खो- खो व कबड्डी खेळांमध्ये मजल मारतात. अशाप्रकारे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनने त्यांच्या कार्याची दखल घेऊन नुकताच संपन्न झालेल्या पत्रकार असोसिएशनच्या नवव्या वर्धापनदिनी रायगड लोकसभेचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते शैक्षणिक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

यावेळी रायगडच्या पालकमंत्री ना.अदितीताई तटकरे, आ.अनिकेतभाई तटकरे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते नरेंद्रशेठ जैन, दिलीपभाई टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, जेष्ठ पत्रकार जयंत धुळप, ठाण्याचे उद्योजक डॉ. जितेंद्र खेर, मनसे जिल्हा संघटक गोवर्धनभाई पोलसानी, पत्रकार असो. चे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, काँग्रेस रोहा तालुका अध्यक्ष निजामभाई सय्यद, नागोठण्याचे माजी सरपंच विलास चौलकर, माजी सरपंच लियाकत कडवेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, माजी उपाध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, शेकापचे जेष्ठ कार्यकर्ते नारायण भोईर (गुरुजी), भाजपाचे रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर आदींसह नागोठणे शहर व विभागातील पत्रकार असोसिएशनचे हितचिंतक उपस्थित होते.

पुरस्कार प्राप्त रमेश मोसे यांचे कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष संजय पाटील, शाळा समिती सदस्य, सर्व शिक्षक वर्ग व मित्रपरिवार यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

## मोटार सायकल विकत देतो असे सांगून ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार सायकल विकत देतो असे सांगून त्याद्वारे ७५ हजार रुपयाची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे.

उसर्ली खुर्द येथील सलीम दुराणी अबासी यांना सेकंड हॅण्ड बुलेट गाडी खरेदी करायची होती. त्यांना ओएलएक्स ऑनलाईन साईटवर बुलेट मोटार सायकल दिसून आली त्यानंतर त्यांनी समोरच्या व्यक्तीला फोन केला असता त्यांनी त्याचे विश्वनाथ तुपके असे सांगून तो सीआयएसएसमध्ये नोकरीस असल्याचे सांगितले. त्यांच्यात ७५ हजार रुपयाचा व्यवहार ठरला. अबासी यांनी ७५ हजार रुपये त्यांच्या अकाऊंटवर जमा केले.

यावेळी तुमची गाडी अहमदाबादवरुन निघ-ाली असून ती तुम्हाला लवकरच मिळेल असे सांगितले. मात्र त्यानंतर अबासी यांच्याकडून बुलेट गाडी मिळाली नाही त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## चारचाकी गाडी भरुन गुटखा विक्री करणाऱ्यांविरुद्ध कामोठे पोलिसांनी केली कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिका हद्दीत कोरोना विषाणू साथीचा आजार कोविड १९ दिवसेंदिवस फैलावत चालला असून रुग्णांच्या संख्येत देखील वाढ होत आहे. पनवेल महानगर पालिका व संबंधित पो-लीस ठाणे यांच्यामार्फत नियम मोडणाऱ्या दुकानांवर व व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करीत आहेत. मात्र नुकतेच कामोठे येथे कामोठे पोलीस ठाण्याच्या समोरील बाजूच्या रस्त्यावर मेघना वाईन्ससमोर ह्युंदाई इऑन या चारचाकीमध्ये संपूर्ण गाडी भरून गुटखा, तंबाखू या पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती क्रांतीज्योत महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा व पत्रकार रुपालीताई शिंदे यांना कामोठे येथे राहणाऱ्या महिलांनी दिली त्यानुसार रुपालीताई शिंदे यांनी याठिकाणी जाऊन पाहणी केला असता याठिकाणी दोन इसम खुलेआम गुटखाविक्री करीत असल्याचे आढळून आल्यानंतर तात्काळ रुपाली शिंदे यांनी याची व्हिडीओ शूटिंग पत्रकारांकडून करून घेऊन कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना भेटून याप्रकरणाची माहिती दिली व सत्यता दाखवली.

यावेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी दखल घेऊन सदर गुटखाविक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन च्या मार्फत देण्यात आलेल्या तक्रारी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे हुंडाई युवान गाडी क्रमांक एमएच ६४५० ८६ या चार चाकी गाडीत खुलेआम गुटखा विक्री करणार्या इसमावर कामोठे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३६ २०२० भादवि कलम १८८ २७० २७१ सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन



कायम सन २००५ चे कलम ५१ कलम तीन प्रमाणे गुन्हा गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा मध्ये ह्यामध्ये एम एच ४६ही गाडी जप्त करण्यात आली आहे सबब तक्रारी अर्ज दप्तरी फाईल करण्यात आला आहे.असे पत्र कोमोठे पोलीस स्टेशन मधून मिळाले. आपण आमच्या तक्रारी अर्जावर केलेल्या तात्काळ कारवाई मुळे आपले खूप खूप धन्यवाद.आपण असेच सहकार्य करावे.

## शिवसेना पनवेल शहर शाखेतर्फे सदस्य नोंदणी अभियानास सुरवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पनवेल शहर शाखेतर्फे आज जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, शिरीष बुटाला व शहरप्रमुख अच्युत मनोरे यांच्या उपस्थितीत प्राथमिक सदस्य नोंदणीची सुरुवात करण्यात आली.

तसेच यावेळी शिवसैनिक व पदाधिकार्यांना प्राथमिक सदस्य नोंदणी (२०२० -२०२२) अर्जाचे वाटप करण्यात आले.त्याचप्रमाणे पनवेल उपविभाग संघटक जुनेद पवार यांच्या तर्फे मास्क व सॅनिटायझरचे वाटप रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सदस्य नोंदणी अभियानास शहर संघटक प्रविण जाधव, उपशहरप्रमुख अनिल कुरघोडे, राहुल गोगटे, महिला तालुका संघटक प्रमिला कुरघोडे, उज्वला गावडे,रुही सुर्वे, ग्राहक कक्षाचे कुणाल कुरघोडे, विभाग प्रमुख सुजन मुसलोंडकर,नंदू घरत, उपविभाग प्रमुख बाळा शेट्ये, कुशल भगत, उपविभाग संघटक जुनेद पवार, वाईकर, शाखाप्रमुख चंद्रकांत शिर्के, राजेश शेट्टीगार, आनंद घरत आदी शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष-युथ रिपब्लिकन पक्षातर्फे चैत्यभूमी दादर येथे मोर्चाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष-युथ रिपब्लिकन पक्षातर्फे राष्ट्रीय अध्यक्ष मनोजभाई संसारे व रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली शविार दि.१० ऑक्टोबर रोजी चैत्यभूमी दादर या ठिकाणी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

हाथरसमधील सामुहिक बलात्कार व अमानवीय हत्याकांडच्या निषेधार्थ विशाल आक्रोश मशाल मोर्चा दादर येथील चैत्यभूमी शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२० रोजी दुपारी १ वाजता राजगृह दादर ते चैत्यभूमी दादर असा निघणार आहे.

या मोर्चाला पनवेल शहरासह रायगड जिल्ह्यातून हजारो समाजबांधव सहभागी होण्यासाठी जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी यावेळी दिली.

# संक्षिप्त...

## नवी मुंबई पालिकेला डबल ए प्लस पत मानांकन



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महानगरपालिकेला सलग सहाव्या वर्षी डबल ए प्लस पत मानांकन प्राप्त झाले आहे. सातत्यपूर्ण बहुमान मिळविणारी नवी मुंबई देशातील एकमेव महापालिका असून, काटेकोर आर्थिक नियोजनामुळे कामगिरीत सातत्य ठेवणे शक्य झाले आहे.

देशातील आर्थिकदृष्ट्या सक्षम महानगरपालिकांमध्ये नवी मुंबईचाही समावेश आहे. मनपाकडे एमएमआरडीए, एमआयडीसी किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून घेतलेले कर्ज थकलेले नाही. कर्मचारी व ठेकेदारांची बिले वेळेत दिली जात आहेत. होस्ट टू होस्ट प्रणालीद्वारे देयके दिली जात आहेत. करवसुलीही उत्तम प्रकारे सुरू आहे. या सर्व कामगिरीची दखल घेऊन इंडिया रेटिंग अँड रिसर्च या संस्थेच्या वतीने मनपाला २०१९ – २० या आर्थिक वर्षासाठी डबल ए प्लस मानांकन देण्यात आले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज गरड व त्यांच्या विभागातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आर्थिक नियोजनाकडे बारकाईने लक्ष दिले आहे.

## ऑनलाईन परीक्षेपासून विद्यार्थ्यांना अडवले

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

शुल्क न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेपासून डावलले जात आहे. अशाच शाळेबद्दल मनसेकडे तक्रार प्राप्त झाली होती. यानुसार, मनसेच्या शिष्टमंडळाने नेरूळच्या पोद्दार शाळा व्यवस्थापनाला धारेवर धरून डावललेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेची लिंक खुली केली.

लॉकडाऊनमुळे ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. यादरम्यान, पालकांवर आर्थिक संकट असल्याने त्यांना शुल्क भरण्यासाठी सक्ती करू नये, असे शासनाचे निर्देश आहेत. यानंतरही अनेक शिक्षण संस्था पालकांकडे शुल्क आकारणीसाठी तगादा लावत आहेत. त्याचप्रमाणे, शुल्क न भरणाजया विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण, तसेच परीक्षेत डावलले जात आहे. अशीच तक्रार नेरुळच्या पोद्दार शाळेच्या पालकांनी मनसेच्या विद्यार्थी सेनेकडे केली होती. शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षेची लिंक ब्लॉक करण्यात आली होती. त्यावरून मनविसेचे शहर अध्यक्ष सविनय म्हात्रे यांनी शिक्षण अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती, परंतु पालिकेच्या शिक्षण अधिकाजयांनाही न जुमानता, मंगळवारी शाळा व्यवस्थापनाने पुन्हा त्या विद्यार्थ्यांना परीक्षा देऊ दिली नाही. त्यामुळे संतप्त मनविसेच्या शिष्टमंडळाने शाळेवर धडक देत प्रशासनाला धारेवर धरले. यावेळी मनविसे शहर अध्यक्ष सविनय म्हात्रे, अमोल आयवले, समृद्ध भोपी, अप्पासाहेब जाधव, भरत पासलकर, अखिल खरात, नरेश कुंभार, प्रद्युमन हेगडे आदी उपस्थित होते. त्यानंतर, पुन्हा ऑनलाइन परीक्षेची लिंक सुरू करण्यात आली. मात्र, यानंतर पुन्हा विद्यार्थ्यांची परीक्षा थांबवल्यास शाळेविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

## उरणमध्ये कोरोनाचे ९ रुग्ण तर दोघांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

देशात व राज्यात कोरोनाचा फैलाव कमी होण्याच्या मार्गावर असतांना मात्र उरण तालुक्यात काल ९ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची नोंद झाली असून, विंधणे –१ व चिरनेर – १ अशा दोन गावातील रुग्णांचा कोरोनाने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर १८ रुग्ण कोरोनामुक्त होऊन सुखरुप घरी परतले आहेत.



यामध्ये तालुक्यातील इंलिव्हिंग ब्लॉक आयएनएस तुनीर नेव्हल स्टेशन करंजा – १, खोपटे – १, बाजारपेठ सेंटमेरी स्कूल जवळ उरण – १, स्टार कॉम्प्लेक्स म्हातवली – २, सेक्टर ३० बोकडविरा – १, बोकडविरा गाव – १, विंधणे – १ व चिरनेर – १ असे एकूण ९ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. तर वाणी आळी उरण १, जेएनपीटी टाऊनशिप – ४, मांगीरदेव झोपडपट्टी – १, महागणेश सोसायटी कामठा – १, केगाव बाजारपूर – १, द्रोणागिरी उरण – १, श्रीयोग्य सोसायटी चाणजे – १, जासई – १, चिर्ले – ३, विनायक केगाव – १, मधुरीमा बिल्डिंग बोरी – २ व ग्रँडवेल कॅम्पस मोरा – १ असे एकूण १८ रुग्ण कोरोनवर मात करून सुखरूप घरी परतले आहेत. तालुक्यातील कोरोना मृतांची संख्या आत्ता ९९ वर पोहोचली असून, विद्यमान कोरोनाग्रस्त १३० रुग्ण बोकडविरा व जेएनपीटी येथील कोविड सेंटरमध्ये उपचार घेत असून, त्यांची प्रकृती सुरळीत असल्याची माहिती उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

# ‘टीआयए’ चे अध्यक्ष सतीश शेट्टी (अण्णा) यांनी घेतली सिडको व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष यांची भेट

## तळोजा औद्योगिक वसाहतीतील विविध समस्यांसंदर्भात झाली चर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील विविध समस्यांसदर्भात टीआयएच्या पदाधिकार्यांनी सिडको व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष डॉ. संजय मुखर्जी यांची भेट घेतली व त्यांच्यासमोर समस्या मांडल्या.



सहव्यवस्थापकीय संचालक कैलाश शिंदे, तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या (टीआयए) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांनी डॉ संजय मुखर्जी (आयएएस) यांची भेट घेतली. यावेळी तळोजा एमआयडीसी क्षेत्रात योग्य मार्गाने संपर्क साधण्याचे मार्ग नसल्याचे सतीश शेट्टी (अण्णा) यांनी व्यक्त केले. त्यामुळे, तळोजा एमआयडीसीमध्ये मेट्रो स्थानके उभारण्याच्या स्थितीविषयी चर्चा झाली. टीआयएने यावर भर दिला की दोन मेट्रो स्थानके (स्टेशन क्रमांक १२ आणि १३) उभारणे उद्योग व त्यांचे कर्मचारी यांच्यासाठी एक वरदान ठरेल. याशिवाय तळोजा परिसरातील रहिवासीही या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. सतीश शेट्टी (अण्णा) म्हणाले की मेट्रो मेट्रोने तळोजा एमआयडीसी क्षेत्राशी जोडलेले नसल्यास १ ते ११ या काळात मेट्रो स्थानकांना सिडकोसाठी व्यावसायिक व्यवहार्यता मिळणार नाही. कारण तळोजा एमआयडीसीमध्ये ३ लाख कर्मचारी काम करतात. डॉ. मुखर्जी यांनी ही समस्या समजून घेतली. तळोजा सीईटीपीपासून रोडपालीला जोडणार्या उड्डाणपुलापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण पूर्ण करण्याच्या स्थितीवर चर्चा झाली. तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील हा दुसरा प्रवेश रस्ता आहे. अर्धा रस्ता पूर्ण झाला आहे. सतीश शेट्टी (अण्णा) यांनी सिडको व त्याचे कंत्राटदार (पी.पी.खारपाटील) यांचे आभार मानले. यावेळी डॉ. मुखर्जी यांनी आश्वासन दिले की मे २०२१ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. सतीश शेट्टी (अण्णा) यांनी विनंती केली की डिसेंबर २०२० पर्यंत एकत्रीकरणाचे काम पूर्ण होईल याबद्दल आम्ही आशावादी आहोत. पेंधर मेट्रो स्थानकाकडे जाण्याचा मार्ग– टीआयएने यावर भर दिला तळोजा एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या अभियांत्रिकी विभाग (ब्लॉक ए, बी, सी, डी आणि ई) पासून सुरू होणारे आगामी पेंढार मेट्रो स्थानकाकडे जाणारा रस्ता. मुखर्जी म्हणाले की हे काम शक्यतेसाठी हाती घेण्यात येईल. नवीन उड्डाणपूल आवश्यक– टीआयएने सिडकोला जुन्या मुंबई पुणे महामार्गावरुन तळोजा एमआयडीसीकडे जाणार्या रोडपाली (कळंबोली) येथून उड्डाण करणारे उड्डाणपूल बांधण्याचा विचार करण्याची विनंती केली. डॉ. मुखर्जी यांनी यावर सहमती दर्शविली आणि सांगितले की, उड्डाणपूल बांधण्याचे काम सिडको करीत आहे. टीआयएने सिडकोने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. ट्रक टर्मिनस–टीआयएने ट्रक टर्मिनसच्या बांधकामासाठी भूखंड देण्याचा विचार करण्याची विनंती सिडकोला केली. या हालचालीमुळे परिसरातील ट्रक वाहतुकीचे प्रमाण कमी होईल. सतीश शेट्टी (अण्णा) म्हणाले की, सिडकोचे भूखंड उपलब्ध आहेत, जे ट्रक टर्मिनस तयार करण्यासाठी राखीव ठेवता येतील. डॉ. मुखर्जी यांनी सिडकोने भूखंड दिल्यास ट्रक टर्मिनस कोण चालवणार याबाबत विचारणा केली. सतीश शेट्टी (अण्णा) यांनी अशी टीका केली की टीआयए स्वतःहून हे करू शकते किंवा प्रकल्पासाठी ऑपरेटरची व्यवस्था करू शकते. डॉ. मुखर्जी यांनी सुचवले की हा विषय सुरू करण्यासाठी लिलाव बोलवावा. वेटरब्रिज–टीआयएने वेटरब्रिज उभारण्यासाठी तळोजा एमआयडीसी क्षेत्रात सिडको भूखंड देण्यास सिडकोवर जोर दिला. डॉ. मुखर्जी म्हणाले की, आपण यावर काम करू आणि कोणत्याही भूखंडाला वाटप करता येईल का याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू. बफर झोन आवश्यक – टीआयएने म्हटले आहे की, तळोजा एमआयडीसीमध्ये बफर झोन क्षेत्राचे सीमांकन केले जावे कारण उद्योग व निवासी क्षेत्रासाठी हा विभाग असणे आवश्यक आहे. यामुळे औद्योगिक आपत्तींमध्ये रहिवासी सुरक्षित राहतील. याप्रकरणी आपण लक्ष घालू असे श्री. मुखर्जी म्हणाले. ईएसआयसी हॉस्पिटल–तळोजा एमआयडीसी ३ लाखांहून अधिक लोकांना रोजगार देते आणि यातील बहुतेक लोक ईएसआयसी सेवा मिळवण्याच्या श्रेणीत येतात. म्हणून टीआयएने डॉ. मुखर्जी यांना समजावून सांगितले की पनवेल भागात ईएसआयसी हॉस्पिटलची उपस्थिती सर्वांसाठी एक वरदान ठरेल. डॉ. मुखर्जी म्हणाले की, ईएसआयसी प्रकल्प राबविण्यास तयार असेल तर सिडको अशा हॉस्पिटल प्रकल्पाला पाठिंबा देण्यास उत्सुक असेल. सिडकोने टीआयएला हा उपक्रम सुरू करण्यास, समन्वय साधून संयुक्त बैठकीची व्यवस्था करण्याचा सल्ला दिला. पुढे डॉ. मुखर्जी यांनी ही बाब ईएसआयसी आयुक्तांकडे मांडणार असल्याचे सांगितले. टीआयएने डॉ. संजय मुखर्जी (आयएएस) आणि कैलास शिंदे (आयएएस) यांनी आपला मौल्यवान वेळ सामायिक केल्याबद्दल आणि त्यांच्यासमोर ठेवलेल्या मुद्द्यांचा विचार केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. सिडको– डॉ. संजय मुखर्जी (आय.ए.एस.) –चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक–सिडको लि. कैलाश शिंदे (आयएएस) –जॉईंटचे मॅनेजिंग डायरेक्टर ढ टीआयए सतीश शेट्टी (अण्णा) –चे अध्यक्ष बनीत सालियन–माननीय कोषाध्यक्ष बिदुर भट्टाचार्य–सरचिटणीस श्री. सुनील पाधीहरी–कार्यकारी सचिव यांच्या बैठकीत उपस्थित होते

## श्रीवर्धनमध्ये महाराष्ट्र शासन, पोलीस पाट्या लावून फिरणाऱ्या गाड्यांचा सुळसुळाट

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

कोणताही सरकारी कर्मचारी अथवा अधिकारी आपल्या खासगी गाडीवर महाराष्ट्र शासन, पोलीस नावाची पाटी लावता येत नाही. याबाबत प्रादेशिक परिवहन खात्याचे नियम असताना श्रीवर्धनमध्ये हे नियम पायदळी तुडवले जात असल्याचे दिसून येत आहे.

सरकारी कर्मचारी, पोलीस आपल्या वाहनांवर महाराष्ट्र शासनाची पाटी लावून बिनधास्तपणे फिरताना दिसत आहेत. तर काही वेळा अधिकारी किंवा पोलीस यांचे ड्रायव्हर किंवा त्यांची मुले देखील अश्या पाट्या लावलेली वाहन चालवताना दिसत आहेत. महामार्ग आणि इतरत्र होणाऱ्या पोलीस कारवायांपासून वाचण्यासाठी, सुटका होण्यासाठी वाहनांवर पोलीस, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, पत्रकार आदी पाट्या सर्रासपणे लावल्या जातात. आर. टी. ओ. च्या नियमांप्रमाणे खासगी वाहनांवर अश्या प्रकारे नाव वापर करणे गुन्हा आहे. मात्र तरीही अनेक वाहनांवर अश्या प्रकारच्या पाट्या लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे आर. टी. ओ. ने या प्रकरणी विशेष मोहीम काढून कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे. शासकीय कामासाठी भाडेतत्त्वावर ज्या गाड्या घेतल्या जातात त्या गाड्यांचा करार संपला तरी देखील अशा गाड्यांच्या दर्शनी भागावर अजूनही महाराष्ट्र शासन असे लिहिलेले असल्याचे दिसत आहे.

## डी–मार्टमध्ये केली महिलेने चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डी–मार्टमध्ये एका महिलेने चोरी केल्याचे उघडकीस आले असून सदर महिलेला खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १५ येथील डी–मार्टमध्ये गेलेल्या सदर महिलेने बदाम, काजू, तुप असे ३ हजार ३०३ रुपये किंमतीचे सामान चोरुन घेवून त्या बाहेर पडत असताना तेथे सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत असलेल्या राधिका शर्मा यांना ही बाब लक्षात आल्याने सदर महिलेला ताब्यात घेवून तिची तपासणी केली असता तिच्याकडे हा चोरीस माल सापडल्याने तिच्याविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून तिला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## पालीतील स्मशानभूमी मरणासन्न अवस्थेत

### अस्वच्छ, सोयीसुविधांचा अभाव, शेडची दुरावस्था, दारुड्यांचा धुडगूस



**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : पालीतील स्मशानभूमीची अत्यंत दुरवस्था झाली आहे. स्मशानभूमीतील एका बाजूच्या जमिनीला भेगा गेल्याने तो भाग कधीही कोसळू शकतो. स्मशानातील व शेडच्या फारशा तुटल्या आहेत. देखभाल दुरुस्ती नाही, अस्वच्छ व सोयी सुविधांचा अभाव आणि दारुड्यांचा धुडगूस यामुळे ही स्मशानभूमी मरणासन्न अवस्थेत आली आहे.

बऱ्याचदा दहन विधी झाल्यानंतर संबंधित लोक किंवा ग्रामपंचायत मार्फत साफसफाई देखील केली जात नाही. रात्रीच्यावेळी विजेची व्यवस्था नाही. विजेचे दिवे लावल्यावर लगेच चोरून नेले जातात. सभोवतालचे संरक्षक कठडे मोडले आहेत. त्यातच जमिनीला भेगा पडून जमीन खचली आहे. ती केव्हाही नदीत पडून दुर्घटना होण्याची शक्यता आहे. लोकांना बसण्यासाठी केलेल्या शेडचे सर्व कडप्पे फोडले आहेत. याठिकाणी नियमित दारुडे दारू पिण्यासाठी येतात. दारूच्या बाटल्या प्लास्टिकची वेष्टणे तिथेच टाकतात. अनेक वर्षांपासून येथे देखभाल दुरुस्ती न झाल्याने सर्वकाही मोडकळीस आले आहे. तसेच याठिकाणी पूर्णवेळ कर्मचारी देखील नसल्याने लोकांची गैरसोय होते. यासर्व परिस्थितीमुळे मृतदेहाची व मृतांच्या नातेवाईकांची फरफट होत आहे.

### सरणासाठी लाकडे मिळवितांना होरपळ

पालीतील एकमेव लाकडांची वखार बंद झाल्याने सरणासाठी लागणारी लाकडे नागोठणे येथून आणावी लागतात. त्यासाठी वेळ, पैसा व श्रम वाया जातात. आणि यासाठी तारांबळ देखील उडते.

## पोलादपूर शहरात माकडांच्या तर तालुक्यात रानडुकरांच्या बंदोबस्ताची गरज

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरामध्ये गेल्या काही वर्षांपासून माकडांचा उच्छाद वाढला असून तालुक्यात भातपिक हाताशी येत असताना रानडुकरांच्या झुंडी वाढत आहेत. पोलादपूर नगरपंचायतीने मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण करून नियंत्रण ठेवल्यानंतरही शहरातील विविध रस्त्यांवर गेल्या आठवडाभरात कुत्रीची पिल्लं आढळून आल्याने निर्बिजीकरणाच्या खर्चाच्या फलश्रृतीबाबत शंका निर्माण झाली आहे.

पोलादपूर शहरामध्ये २००६ पासून माकडांचा मुक्तसंचार दिसून येत आहे. पुर्वी पोलादपूर तहसिल कार्यालयासमोर जप्त करून उभा करण्यात आलेल्या एका तांदळाच्या टेम्पोमध्ये तांदूळ खाण्यासाठी माकडांची कुटूंब गोळा झालेली दिसून येत असताना काही कालावधीनंतर तो टेम्पो मूळ मालकाने ताब्यात घेतल्याने ही माकडांची कुटूंबं पोलादपूर शहरातील विविध लोकवस्त्यांमध्ये मुक्त संचार करून नागरिकांना प्रचंड प्रमाणात त्रास देऊ लागली आहेत. गेल्या दोन वर्षांपूर्वी पिसाळलेल्या माकडांनी महिलांना चावे घेतल्याच्या घटना झाल्या असताना वनविभागाकडून या घटनांची गांभिर्याने दखल घेतली गेली नाही. गेल्यावर्षी शेतात भातपिक हाती येण्याच्या सुमारास रानडुकरांनी दिविल भागातील एका शेतकरी कुटूंबावर हल्ला करून जखमी केल्यानंतरही कोणत्याही प्रकारे वनविभागाने रानडुकरांचा बंदोबस्त केला नाही. परिणामी, पोलादपूर तालुक्यात रानडुकरांपासून भातपिकाचे रक्षण करण्यासाठी रात्री पहारा देण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवली असताना रानडुकरांपासून संरक्षण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे हत्यार बाळगून केलेल्या प्रतिकारात रानडुकर मेल्यास शिकारीचा गुन्हादेखील शेतकऱ्यांविरूध्द नोंदण्यात येण्याच्या शक्यतेने कोणी असा प्रतिकार अथवा बंदोबस्त करण्याच्या मनस्थितीत दिसून येत नाही. परिणामी, शेतकऱ्यांच्या शेताची नासधूस होऊन मोठ्या प्रमाणात नुकसानही होत असल्याचे दिसून येत आहे. पोलादपूर तालुक्यातील वनविभागाने पोलादपूर शहरातील माकडांचा आणि तालुक्यातील ग्रामीण भागातील रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने प्रयत्न केले नाही तर पिकांच्या संरक्षणाच्या प्रयत्नात शेतकऱ्यांवर हकनाक शिकारीचे गुन्हे लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गेल्याच वर्षी पोलादपूर नगरपंचायतीने मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाची मोहिम मोठ्या प्रमाणात राबवूनही सध्या शहरातील रस्त्यांवर कुत्रीची नवजात पिल्ले ठिकठिकाणी दिसून येत आहेत. त्यामुळे निर्बिजीकरणाच्या मोहिमेचा खर्च वाया गेला अथवा कसे, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा होत आहे. दुसरीकडे, शहरातील माकडांच्या माद्यांचाही विण्याचा काळ जवळ आला असल्याने यंदा माकडांच्या संख्येत वाढ होण्याची लक्षणे दिसून येत आहेत तर ग्रामीण भागात झुंडीने वावरणाऱ्या रानडुकरांच्या माद्याही विण्याची शक्यता असल्याने त्यांच्याकडून भातपिकांसह कंदमुळे आणि अन्य भूमीउपज मोठ्या प्रमाणात फस्त केले जात आहे. यामुळे पोलादपूर वनविभागाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

## मंदीरे बंद ! बार सुरु !! राष्ट्रीय वारकरी परिषदेकडून सरकारचा जाहिर निषेध

**दै.रायगड नगरी । वाकण**

कोरोनाच्या पार्श्वभूमीचा संदर्भ देऊन दळणवळण बंदीनंतर आता मंदिरे सोडून सर्व काही हे सरकार सुरू करीत आहे, दारूचे दुकाने, मॉलची दूकाने, क्रिकेट मॅच, एस टी बस, आतातर रेस्टॉरंट व बारही सुरू करण्यात आले आहेत. म्हणुन राष्ट्रीय वारकरी परिषद याचा जाहीर निषेध करत आहे असे राष्ट्रीय वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष ह.भ.प. बापूमहाराज रावकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकामार्फत जाहीर केले आहे.

ह.भ.प. बापूमहाराज रावकर यांनी आपल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी व शुरविरांची भूमी आहे शिवरायांनी हिंदु मंदीराचे रक्षण करून हिंदु धर्माला उर्जा दिली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संतश्रेष्ठ नामदेव महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, रामदास स्वामी अशा असंख्य साधु संतांनी भक्तीमार्ग जगाला शिकवला त्याचाच परिणाम म्हणुन जगभरातील लोक अध्यात्माची शिकवण घेण्यासाठी भारतात येतात पण संतांची शिकवण ७० वर्षात हे सरकार देऊ शकले नाही त्यामुळे आज माणुस माकडापेक्षाही हिनतेचे दर्शन घडवत आहे. भारतभर बलात्कार होत आहेत त्यामध्ये भारतात महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकावर आहे ही गंभीर बाब पाहत असताना त्यात जनतेला अजुन दारूच्या नशेत ठेवण्याचे व ईश्वर दर्शना पासुन वंचीत ठेवण्याचे षडयंत्र हे सरकार करत आहे हे अत्यंत वाईट असुन हे निंदनीय आहे व आम्ही वारकरी याचा तीव्र निषेध व्यक्त करत आहोत मद्यापेक्षाही आज जास्त मनः शांतीची आवश्यकता आहे सर्व रोजगार बुडालेला आहे माणूस घरात असूनही अस्वस्थ आहे व याला मनःशांति साठी मंदीरातील आध्यात्माची आणि दर्शनाची आवश्यकता आहे. राज्यात घडणाऱ्या या प्रकारांसाठी अध्यात्माचाच प्रमुख आधार आहे. घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिले असतानाही उपासना देवदर्शन यापासून वंचित ठेवण्याचे महापाप हे सरकार करत आहे हिरण्यकश्यप हा एक राजा होता आणि तो भक्त प्रल्हाद यांना भक्ती करण्यास विरोध करत होता याच प्रमाणे हे सरकार नास्तिकवादांच्या नादाला लागून धर्मद्रोही, संतविरोधी निर्णय घेत आहे याचा आम्ही वारकरी तीव्र जाहीर निषेध करत आहोत अशी प्रतिक्रिया राष्ट्रीय वारकरी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. मारुती महाराज तुनतुने शास्त्री यांनीही या प्रसिध्दी पत्रकात दिली आहे.

## दुचाकीच्या धडकेत १६ वर्षीय मुलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुचाकीच्या धडकेत एका १६ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यात घडली आहे.

तालुक्यातील पालेबुद्रुक वावंजे रोड येथे एका डंपरने दुचाकीला धडक दिल्याने या धडकेमध्ये विवेक राजभर (१६) याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर डंपर चालक पसार झाला आहे.